


सात पोस्टमनदादा


मार्गरेट वाइज ब्राउन

अनुवाद- मनिषा जाधव



एका मुलाकडे एक गुपित होतं.
मुलाला पत्रातून ते गुपित आजीला कळवून तिला चकित करायचं होतं.
म्हणून त्याने आपले गुपित पत्रात लिहून ते पोस्टाने आजीला पाठवले.
ही त्या पत्राची गोष्ट आहे.
सात पोस्टमनदादांनी ते पत्र आजीपर्यंत कसं पोचवलं त्याची ही गोष्ट आहे.

पत्रात गुपित होतं, म्हणून मुलाने लाल रंगाच्या लाखेने पत्र सीलबंद केलं.
जर ते सील कोणी उघडलं, तर गुपित फुटलं असतं.



त्याने पत्र पोस्टाच्या पेटीत टाकलं.




पहिल्या पोस्टमनदादांनी पोस्टपेटीतून पत्र घेतलं.
आणि आपल्या पिशवीत ठेवलं.
सतरा चौक पार करून दगडी बांधकाम असलेल्या
एका खूप मोठ्या पोस्ट ऑफिसात नेलं.







गुपित लिहिलेलं ते पत्र
इतर लहान-मोठ्या पत्रांबरोबर
पत्रांच्या ढिगात टेबलावर जाऊन पडलं.
मोठ्या पोस्ट ऑफिसचा
शिक्का सर्व पत्रांवर पडणार होता.

ठप् ठप्...क्लिक क्लिक
एकेका पत्रावर मशीन भराभर शिक्के मारू लागलं.
गुपित लिहिलेल्या पत्रावरही एकदाचा शिक्का पडला.
पत्रावरचा काळा गोल शिक्का सांगत होता,
'हे पत्र पुढे जाण्यासाठी निवडलं गेलं आहे.'
क्लिक क्लिक ... जाऊ दे पुढे वेगानं ..




मोठी पत्रं, छोटी पत्रं
चपटी पत्रं, जाडजूड पत्रं ..
दुसऱ्या पोस्टमनदादांनी
गठ्ठे केले सगळ्या पत्रांचे.
कोणती पत्रं कुठं जातील?
पुर्वेकडून पश्चिमेकडं
उत्तरेकडून दक्षिणेकडं





“आणि आता हे पत्र जायला
पाहिजे पश्चिमेकडं”
आपली छाती खाजवत
दुसरे पोस्टमनदादा म्हणाले.
“ते पत्र पोस्टाच्या थैलीत ठेवा.
थैली नीट बंद करा.”
गुपित लिहिलेलं ते पत्र
प्रवास करेल रात्रभर.


पोस्टाची मोठी गाडी घेऊन तिसरे पोस्टमनदादा निघाले.
चौक झालेला खूपच जाम.
हिरव्या, पिवळ्या, जांभळ्या गाड्या थांबलेल्या.
काय सांगायचं, गर्दी वाढली की थांबायलाच लागतं,
पोस्टाच्या गाडीला मात्र सर्वांच्या आधी पुढे जायला परवानगी असते.
पत्रं वेळेत पोहोचायला हवीत.






पुढच्या गावात पत्रं नेतोय वैमानिक
विमान वेगात, खूप वर आकाशात
गारपीट आणि पावसातून
चहुबाजुने बर्फ आणि घोंघावणाऱ्या वाऱ्यातून.

पत्रं येतात विमानातून,
पुढं जातील संध्याकाळी रेल्वेतून
चमकणाऱ्या रुळांवरून इंजिन धावतंय वेगानं
पत्राची थैली अडकवून ठेवलेली असते मोठ्या हुकावर
शिताफीनं थैली ताब्यात घ्यायची चौथ्या पोस्टमनदादानं






शिट्टी वाजवत, धूर सोडत
रेल्वे धावते वेगानं
चौथे पोस्टमनदादा लागतात कामाला
पत्रं गठ्ठ्यात लावायला


रेल्वे धावते पत्रं घेऊन रात्रीच्या अंधारात
डब्यात मात्र पत्रांच्या
दिव्यांचा झगमगाट .

छोट्याशा गावचा पाचवा पोस्टमनदादा
थांबतो रस्त्याच्या कडेला
त्याच्या पत्रांची वाट बघत




ताकद लावून रेल्वेतून थैली भिरकावतो
माणूस पोस्टाचा.
झेलतो बरोब्बर, धरतो घट्ट
पाचवा पोस्टमनदादा आहे खात्रीचा

छोट्या रस्त्यावरून आता तो निघतो
आणि टेकडीच्या माथ्यावर पोहोचतो.
त्याला एक गाव लागतं.
जिथं जेमतेम एकच पोस्ट ऑफिस
असतं. इतकं ते गाव लहान असतं.



सहावे पोस्टमनदादा
मोठ्ठे बूट घातलेले
करतात पुन्हा गठ्ठे पत्रांचे
वेगवेगळ्या रस्त्यांचे.
काही पत्रं जातील खाली नदीच्या बाजूला
काही पत्रं जातील वर डोंगराच्या बाजूला



पण गुपित असलेलं पत्र तर
अजून पुढं जाणार आहे.



सातवे पोस्टमनदादा RFD गाडीतून पोस्टाच्या
पेपर, चिकन आणि टोपली फळांची घेऊन निघतात.
लोकांसाठी, जे वाटेवर राहतात.

त्यांनी बरोबर ट्रॅक्टरचं चाक घेतलं



आणि नटासाठी केसांचा टोप घेतला..



आणि एक मजेदार पोस्टकार्ड

मागच्या अंगणात

खेळणाऱ्या बाळासाठी



सॅलीसाठी काय काय


आणि सॅमसाठी बरंच काही



पॉटरबाईला लागणारं काहीबाही

ती फळांचा जाम करत होती.





पिकेंसबाईसाठी आणलेली
डझनभर कोंबडीची पिल्लं

मैककार्टीबाईसाठी एक
पार्टीचा ड्रेस होता.



त्या रस्त्यावरच्या अगदी शेवटच्या घरात मुलाची आजी बसली होती. मुलाने ते गुपित लिहिलेले पत्र तिलाच पाठवलं होतं. आपला नातू भेटायला यावा असं तिला दिवसभर वाटत होतं. कारण त्या छोट्याशा घरात ती एकटीच राहायची. काही वेळा तर तिला अगदी एकटं वायचं.



पोस्टमनदादाने शिट्टी वाजवली, आणि
लाल रंगाची लाख लावलेले ते पत्र आजीला
दिलं...गुपित लिहिलेले पत्र !

अरे व्वा ! कुणाचं आलंय पत्र?
ओ हो ... आता गुपित बाहेर येणार !
काय लिहिलंय पत्रात ?



प्रिय आजी,

तुला हे कळवण्यासाठी पत्र लिहित आहे, की मी या शनिवारी तुला भेटायला येत आहे. माझ्या मांजराला सात पिल्लं झालीत. आणि त्यातलं एक मांजराचं पिल्लू मी तुझ्यासाठी घेऊन येत आहे.

पोस्टमनदादा माझा मित्र आहे.

तुझा नातू,
थॉमस





सात पोस्टमनदादा





सात पोस्टमनदादा पोचवतात पत्रं
पाऊस, बर्फ, गारा आणि वाऱ्यातून
अंधाऱ्या रात्रीच्या प्रवासातून

सात पोस्टमनदादा
नजरेआड असलेले,
जमीन आणि समुद्रापार
दिवसरात्र, अंधारात प्रवास करून
मारतात शिक्का पत्रावर
आणि पोचवतात योग्य जागेवर





समाप्त

समाप्त